# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.० अंतर्गत बाह्य यंत्रणेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या समूह सहायकांसाठी SMA पोर्टलवर ऑनबोर्डिंग करणेबाबतच्या सूचना

बाह्य यंत्रणेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या समूह सहायकांना जिल्ह्यांतर्गत गावसमूह सज्जा (jurisdiction) नेमून द्यावयाचा आहे. सदर कामकाज प्रकल्पाच्या Staff Monitoring Application (SMA) पोर्टलद्वारे करावयाचे आहे. तसेच, बाह्य यंत्रणेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या समूह सहायकांसाठी SMA पोर्टल विकसित करण्यात आले असून, सदर पोर्टल वापरासंदर्भात सूचना खालीलप्रमाणे आहेत:-

१. सदर पोर्टलची लिंक प्रकल्पाच्या संकेतस्थळावर (www.mahapocra.gov.in) डिजीटल उपक्रम शीर्षकाखाली तंत्रज्ञान अनुप्रयोग अंतर्गत मनुष्यबळ सनियंत्रण या नावाने उपलब्ध करून देण्यात आले आहे.


तंत्रज्ञान अनुप्रयोग

प्रकल्प अधिकारी व कर्मचारी


| अनु.क्र. | ॲप्लिकेशनचे नाव | तपशील | पोर्टल | मोबाईल ॲप |
|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्प डॅशबोर्ड | हा डॅशबोर्ड पीएमयूला प्रकल्पाच्या उपक्रमांची अंमलबजावणी आणि गावांमध्ये व प्रशासकीय युनिट्समध्ये चालू स्थितीचे रिअल-टाइम निरीक्षण करण्यात मदत करतो. | लिंक | N/A |
| २ | सूक्ष्म पातळी नियोजन (MLP) | सूक्ष्म पातळी नियोजन ही एक समुदाय-संचालित उपक्रम आहे, जी स्थानिक गरजांनुसार प्रकल्पाअंतर्गत विविध उपक्रमांचे नियोजन करण्यासाठी केली जाते. ही ॲप तीन दिवसीय नियोजन प्रक्रियेमध्ये समुदायाला मदत करते, ज्यात सामाजिक-आर्थिक स्थिती, नैसर्गिक संसाधनांचा वापर, पीक नमुना, व मूल्यसाखळीत समावेश यावर आधारित गावाचा आराखडा तयार केला जातो. | लिंक | डाउनलोड |
| ३ | पाण्याचा ताळेबंद | ही ॲप गावाच्या भौगोलिक वैशिष्ट्यांवर आधारित जलसंतुलनाची गणना करते, जसे की उतार, निचरा नमुना, मातीचा पोत, जमिनीचा उपयोग, पीक पद्धती व हवामान नमुना, सध्या अस्तित्वात असलेले नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, भूजल उपलब्धता आणि माणसे, जनावरे व शेतीसाठी आवश्यक पाण्याची गरज. | N/A | डाउनलोड |
| ४ | संघ | सर्व कर्मचाऱ्यांचा एकसमान डेटाबेस राखण्यासाठी आणि NDKSP प्रणालीसाठी प्रवेश प्रदान करणारी एकात्मिक SSO प्रणाली व्यवस्थापित करण्यासाठी एक पोर्टल. | लिंक | N/A |
| ५ | ग्राम कृषि विकास समिती | एएओसाठी एक पोर्टल जेथे ते ग्राम कृषि विकास समिती सदस्यांची नोंदणी करु शकतात तसेच वगळू शकतात आणि संबंधित उपक्रम व्यवस्थापित करू शकतात. | लिंक | N/A |
| ६ | डीबीटी २.० अधिकारी | हे ॲप प्रकल्प कर्मचाऱ्यांना वैयक्तिक लाभार्थ्यांचे डेस्क -२ (स्थळ तपासणीपूर्वी) आणि डेस्क -४ (स्थळ तपासणीनंतर) करण्यास सक्षम करते. | लिंक | डाउनलोड |
| ७ | प्रशिक्षण ॲप | नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत जिल्हा, उपविभाग व तालुका स्तरावरील अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवक, कृषिताई, ग्राम कृषि विकास समिती सदस्य, शेतकरी आणि लाभार्थी यांचे प्रशिक्षण, कार्यशाळा, बैठका आणि अभ्यास दौरे यासह सर्व प्रकारच्या क्षमता बांधणी (CB) उपक्रमांचे नियोजन, आयोजन, देखरेख आणि नोंदणी करण्यासाठी प्रशिक्षण एप्लिकेशन तयार करण्यात आलेले आहे. | N/A | डाउनलोड |
| ८ | मनुष्यबळ सनियंत्रण | नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत जिल्हा, उपविभाग व तालुका स्तरावरील बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्त कर्मचारी (समूह सहाय्यक, तंत्रज्ञान समन्वयक, प्रकल्प लेखा-प्रापण सहाय्यक, प्रकल्प विशेषज्ञ, प्रकल्प लेखा सहाय्यक) तसेच कृषिताई यांना त्यांची उपस्थिती आणि केलेल्या कामकाजाची नोंदणी करण्यासाठी मनुष्यबळ सनियंत्रण एप्लिकेशन (staff monitoring app) तयार करण्यात आलेले आहे. सदर कर्मचा-यांच्या कामकाजाचे staff monitoring या पोर्टलद्वारे निरिक्षण व देखरेख ठेवण्यात येणार आहे. | लिंक | N/A |

२. SMA पोर्टलवर लॉगिन करण्यासाठी आपल्या कडे उपलब्ध असलेले Teams चे युजर आयडी व पासवर्ड वापरावेत व लॉगिन करावे. लॉगिन केल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या डॅशबोर्ड मधील CA Mapping या पर्यायावर जावे. तेथे उपविभागनिहाय गाव समूह क्रमांक (Cluster Code) उपलब्ध आहेत. त्यासमोर असलेल्या i या चिन्हावर क्लिक केल्यावर गावाची यादी उपलब्ध होईल. View CA List च्या बाजूला समूह सहायकनिहाय गावसमूह सज्जाची माहिती GIS Dashboard वर उपलब्ध करून देण्यात आली आहे. नकाशावर गाव समूह पाहण्यासाठी GIS Dashboard या लिंकवर क्लिक करावे. त्यामध्ये आपला जिल्हा निवडावा, त्यानंतर गाव समूह यादीनुसार सदर गावे जिल्हयात कोणत्या ठिकाणी आहेत, याची माहिती मिळू शकेल.


जिल्हयांतर्गत असलेले सर्व गाव समूह नकाशावर सर्व समूह सहायकांना दाखववावे, जेणेकरुन त्यांना गाव समूह निवड करण्यास मदत होईल.




३. ज्या गाव समूहाची समूह सहायकाने समुपदेशनाद्वारे निवड केली असेल, त्या गाव समूह कोडच्या पुढे संबंधित समूह सहायकाचे नाव (select TNM CA) या drop down मधून निवडावे.




४. अशाप्रकारे रुजू झालेल्या सर्व समूह सहायकांना गाव समूहांचे समुपदेशनाद्वारे वाटप केल्यानंतर सर्व माहिती अचूक असल्याची खात्री केल्यानंतर SUBMIT MAPPING टॅबवर क्लिक करुन माहिती सादर करावी. एकदा सादर केलेल्या माहितीमध्ये नंतर बदल करता येणार नाही.




५.  जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी वरीलप्रमाणे समूह सहायकांचे ऑनबोर्डिंग पूर्ण करावे. समूह सहायकांचे SMA पोर्टलवर ऑनबोर्डिंग झाल्यानंतर समूह सहायकांना त्यांचे आधार संलग्न मोबाईल क्रमांकावर एक संदेश प्राप्त होईल. या संदेशामध्ये

प्रकल्पातील विविध पोर्टल व मोबाईल ॲप वापरण्यासाठी आवश्यक युजर आयडी व पासवर्ड उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच SMS संदेशामधील उपलब्ध केलेल्या लिंकवर क्लिक करुन युजर आयडी व पासवर्ड वापरून Teams पोर्टलवर लॉगिन करावे. नंतर दिलेला पासवर्ड बदलून त्याऐवजी वापरकर्त्याने नवीन पासवर्ड तयार करुन लॉगिन करावे. माहिती अद्ययावत केल्यानंतर Teams पोर्टलवर संबंधित समूह सहायकांचे खाते सक्रिय (Active) होईल. त्यानंतर समूह सहाय्यक प्रकल्पाने विकसित केलेले संबंधित पोर्टल व मोबाईल ॲप नियमितपणे वापरू शकतील.

-------------------